श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांनी कर्तव्यात कसूर केले बाबत पदावरुन तात्पुरत्या स्वरुपात दूर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्र.कार्या-२/खाचौ (द.)/ ३८७ /२०२५
अहिल्यानगर दि २१ /०७/२०२५
(खाली नमुद प्रमाणे)

ज्याअर्थी श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांनी शालेय कामी कर्तव्यात कसूर केले बाबतचा अहवाल गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडुन दि.१०/०७/२०२५ रोजी प्राप्त अहवालानुसार श्री.विलास शंकर पगारे, उपा. यांचेकडुन शालेय पट कमी होणेस जबाबदार असणे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करणे, सहकारी शिक्षकांशी समन्वय नसणे, वर्ग अध्यापनात कसूर करणे इत्यादी प्रकरणी उपाध्यापक तथा मुख्याध्यापक पदाचे कर्तव्यात कसूर केलेची बाब प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे.सदर प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा ३ भंग केला आहे.त्यानुसार तुमचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर मला महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग २ मधील नियम ३ अन्वये मला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन याव्दारे उक्त श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की हा आदेश अंमलात राहिल तेवढया कालावधीत श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांचे मुख्यालय पंचायत समिती---नेवासा---येथे राहिल आणि श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांना गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती ---नेवासा---यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री.विलास शंकर पगारे, उपा. तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि. अहिल्यानगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता देण्यात यावेत.

निलंबनाच्या कालावधीत श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये,त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात,तसेच ते निलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.निलंबनाच्या कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल,त्यावेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांना सादर करावे लागेल.

निलंबनाच्या कालावधीत श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती....नेवासा....जि. अहिल्यानगर हे करतील.

सदरचा आदेश अहिल्यानगर www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202507211600 68 असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.विलास शंकर पगारे, उपा.तथा प्र.मुख्या.जि.प.प्राथ.शाळा करंडेवस्ती (देहरे) ता.जि.अहिल्यानगर व्दारा-गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर

प्रत:-गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर, ता.जि.अहिल्यानगर

२/-सदरचा आदेश संबंधितास बजावून दुस-या प्रतिवर प्रत मिळाले बाबतची दिनांकित स्वाक्षरी घ्यावी व पोहच त्वरीत इकडेस सादर करावी.

प्रत:-गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती----नेवासा----जिल्हा अहिल्यानगर

स्वाक्षरीत/-
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर